ePaper
# अधिकारी स्मीता झगडे यांची ती नियुक्ती अखेर रद्द

| वर्ष - 6 | अंक - 164 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आतील पानांत


- बारामतीबाबत दिल्लीतून कोणत्याही प्रकारची तडजोड होणार नाही-केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन
- पिंपरी-चिंचवडकरांच्या सुरक्षेसाठी आ. लांडगे सरसावले!
- उद्धव ठाकरे खोटारडे अन् लबाड : नारायण राणे


www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 23 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## लोकसंवाद

### पिंपरी-चिंचवड अस्मिता विरोधी अधिकाऱ्यांना

# रेडकार्पेट नकोच!

**एखाद्या शहराचा सर्वांगीण विकास करायचा की भकास... अन् सन्मान- अस्मितांचे संवर्धन करायचे की माती...हे दूरदृष्टी लोकप्रतिनिधीच्या नेतृत्त्वावर अवलंबून असते, तसे सर्वसमावेशक विचार करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवरसुद्धा असते, अशी आमची धारणा आहे. त्यामुळे केवळ 'मी'पणा आणि 'प्रसिद्धी'साठी अधिकारांचा अनितीने वापर करीत शहराच्या अस्मिता आणि भूषणांचे दमण करणारे अधिकारी आम्हाला नकोत, अशी भूमिका स्वागतार्ह अन् तितकीच रास्त.. मग, ती कुणाचीही असो....**

**राज्यात २०१९ पासून राजकीय स्थिती अस्थीर आणि तितकीच तकलादू आहे.** महाविकास आघाडीच्या सत्तास्थापनेचा प्रयोग यशस्वी झाला.. तसा अडीच वर्षांनंतर भाजपाने तो अपयशीही ठरवला. महाविकास आघाडीची सत्ता असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता होती म्हणजे परस्पर विरोधी सत्ता. त्यामुळे निर्माण झालेल्या राजकीय अस्थितरतेमुळे प्रशासकीय 'अंकूश' राहिला नाही. परिणामी अधिकाऱ्यांना बेलगाम अधिकार मिळाले. **त्यातून 'हम करें सो कायदा'ची प्रवृत्ती बळावली. आता भाजपा आणि शिंदे गट अशी नवी सत्ता स्थापन झाली. तसा भाजपाचा प्रशासकीय कारभारातील हस्तक्षेप वाढला, अशी टीका होताना दिसते.** मात्र, सत्ता असताना प्रशासकीय कारभारात ढवळाढवळ करण्याची संधी महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनीही सोडली नाही, अशी वस्तुस्थिती होती. असो....

**राजेश पाटील पायउतार झाल्यानंतर आता महापालिका प्रशासक आणि आयुक्त म्हणून शेखर सिंह यांनी सूत्रे हाती घेतली. त्यानंतर तीनपैकी दोन अतिरिक्त आयुक्तांची बदली होणार हे निश्चित झाले.** त्यानुसार विकास ढाकणे यांच्या बदलीची 'ऑर्डर'ही निघाली. ढाकणे यांच्या बदलीनंतर अतिरिक्त आयुक्तपदावर स्मीता झगडे यांची नियुक्ती झाल्याचे वृत्त आले. **आता झगडे पदभार स्वीकारणार अशी स्थिती असताना राजकीय दबावातून झगडेंना पदभार दिला जात नाही, अशी टीका होऊ लागली. मग, हा दबाव कुणाचा तर भाजपाच्या एका स्थानिक आमदारांचा... असा दावा केला जात आहे.**

**वास्तविक**, शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांनी गेल्या दोन-तीन वर्षांच्या काळात पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अधिकाऱ्यांना अक्षरश: वेठीस धरले. याबाबत कुठेही वाच्छता होताना दिसत नाही. कारण, **"मुकी जनावरे कुणीही हाका..." असाच प्रकार आहे.** सुमारे २० ते २५ वर्षे महापालिकेत काम करणाऱ्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना शहरातील गल्लीबोळाची माहिती आहे. पण, शासननियुक्त अधिकाऱ्यांसमोर झुकावे लागते. अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांकडून पानउतारा सहन करावा लागतो, याचेही कुणाला देणे-घेणे नाही, हे दुर्दैवी आणि तितकेच अन्यायकारक आहे. **शहरातील बलस्थाने, अस्मिता आणि भूषणांशी काहीही आत्मियता नसलेले अधिकारी मग अधिकारांच्या जोरावर मनमानी निर्णय घेतात किंवा लादतात. त्याचे दूरगामी परिणाम शहराला आणि शहरवासीयांना भोगावे लागतील, याचाही विचार झाला पाहिजे.**


'वेदांत फॉक्सकॉन' महाराष्ट्राबाहेर गेला.. आता दाद कुणाकडे मागायची? अशीच परिस्थिती आहे. शहरातील कंपन्यांना आपण पोषक वातावरण निर्माण नाही केले. लघुउद्योगांना वेठीस धरले, तर उद्योग शहराबाहेर जातील. याबाबत अनेकदा चर्चा झडल्या आहेत. **'दानशूर व्यक्ती' म्हणून ज्यांची जगभरात ख्याती आहे, असे उद्योगपती रतन टाटा यांच्या कंपनीचा प्रकल्प पिंपरी-चिंचवडमध्ये आहे. किंबहुना, पिंपरी-चिंचवडची ओळखच टाटा मोटर्स अशी म्हटले तर वावगे ठरणार नाही.** सुमारे १२ हजार कर्मचारी आणि अप्रत्यक्षपणे सुमारे २० हजार कामगारांना रोजगार या कंपनीच्या आणि सलग्न उद्योगांच्या माध्यमातून निर्माण झाला. त्या कंपनीवर तत्कालीन कर संकलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मिळकत कराबाबत नोटीस काढली. त्याला राजकीय आणि सामाजिक पातळीवर विरोध झाला. काही दिवसांपूर्वी प्रशासनाने संबंधित नोटीस मागे घेतली. तसेच आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील मुलांच्या शिक्षणासाठी काम करणारी चिंचवडमधील समरसता पुनरुत्थान गुरूकुलम ही संस्था. पद्मश्री गिरीश प्रभूणे प्रमुख. या संस्थेलासुद्धा आपल्या करसंकलन विभागाने नोटीस बजावली. राज्यभरात शहराच्या नावाचा उदोउदो झाला. तत्कालीन सत्ताधारी नेत्यांनी गुरूकुलमची ही नोटीस मागे घेण्याबाबत निर्णय घेतला. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या चुकीच्या कामाला विरोध केलाच पाहिजे. ही बाब अधोरेखित होते. पण, शहराच्या लौकीकाचा... भूषणांचाही विचार केला पाहिजे. काही विषय संवेदनशीलपणे हाताळले पाहिजेत.. अन्यथा आपल्याला हात चोळत बसण्याची वेळ येणार हे निश्चित आहे. **त्यामुळे अतिरिक्त आयुक्तपदी स्मीता झगडे यांना पदोन्नती देत त्यांनी पूर्वी घेतलेल्या निर्णयांचा एकप्रकारे सन्मानच राज्य सरकार करीत आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला होता. अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर गदा आणली पाहिजे, असे नाही. मात्र, अधिकारी विशिष्ट हेतू डोळ्यांसमोर ठेवून काम करीत असतील, तर त्याला विरोधही केला पाहिजे, अशी आमची भावना आहे.** विशिष्ट अधिकारी म्हणून हा विरोध नाही. अधिकाऱ्यांनी राजकीय व्यक्ती असल्यासारखे वर्तन करु नये, अशी जनभावना आहे. **नैसर्गिक न्याय्य तत्त्वांचा विचार न करता अधिकारांचा तांत्रिकदृष्ट्या वापर करुन शहराच्या प्रतिमेला बाधा येईल, अशा कार्यपद्धतीचा अवलंबत असेल, तर त्या अधिकाऱ्यांना रेडकार्पेट मुळीच नको... ही भूमिका भाजपाचे स्थानिक आमदार महेश लांडगे किंवा लक्ष्मण जगताप यांनी घेतली असेल, तर पिंपरी-चिंचवडकरांकडून या भूमिकेचे स्वागतच आहे. किंबहूना, तमाम पिंपरी-चिंचवडकरांची ही उत्स्फूर्त भावना आहे.**

पीएम केअर फंडच्या विश्वस्तपदी उद्योगपती रतन टाटा आणि सल्लागारपदी प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांची नुकतीच नियुक्ती भारत सरकारकडून करण्यात आली. अशा नामवंत व्यक्तींच्या नावाला गालबोट लागेल, अशी टाटा मोटर्स कंपनीबाबत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने घेतलेली कठोर भूमिका न्याय्य होती का? देशभरात नव्हे जगभरात ज्यांचा सन्मान होतो. त्या टाटांना, पद्मश्री प्रभुणे यांना बदनाम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आपण डोक्यावर घेणार होतो का? हाच सामान्य पिंपरी-चिंचवडकरांचा सवाल आहे. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत पिंपरी-चिंचवडकरांच्या भूमिकेचा विचार निश्चितपणे आदर करतील आणि शहराची धुरा कर्तुत्वसंपन्न अधिकाऱ्यांच्या हाती देतील, अशी अपेक्षा होती ती अखेर खरी ठरली. हा सर्वपक्षीय नेते, कामगार संघटना, व्यापारी संघटना, यांच्या एकजुटीचा विजय आहे.

**लोकशाही व्यवस्थेत कोणताही अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी हा लोकांच्या पर्यायाने त्या शहराच्या सेवेसाठी असतो. मग तिथली अस्मिता, भूषणांबाबत लोकभावना जोडलेली असते. त्या संधर्भात निर्णय घेताना अधिकाऱ्यांनी, संवेदनशीलपणे विचार केला पाहिजे. टट मोटर्स आणि समरसता पुनरुत्थान गुरूकुलम संस्थेवर झालेल्या कारवाईविरोधात महापालिका सभागृहात जाहिरपणे विरोधाची भूमिका घेणारे तत्कालीन नगरसेवक विकास डोळस व कुंदन गायकवाड यांच्या मागे ठामपणे उभे राहणारे सर्व पक्षीय नेते यांच्या भूमिकेचेही स्वागत.**

## शॉर्ट न्यूज

### वीज तोडल्याने महावितरणच्या अधिकाऱ्याला बेदम मारहाण



।पुणे। महाईन्यूज ।

वीजबिल न भरल्याने वीजपुरवठा तोडल्याच्या रागातून महावितरणच्या अधिकाऱ्याला स्टीलच्या रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. त्यात अधिकाऱ्याच्या बोटाचे हाड मोडले आहे.याप्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ सतीश विठ्ठल इंडे (वय ३९) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी सुशील जालिंदर नवले (वय ३५, रा. नगर रस्ता) याला अटक केली आहे. ही घटना पराशर सोसायटीत बुधवारी दुपारी सव्वाबारा वाजता घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडे हे महावितरण कंपनीत अधिकारी आहेत. शाखा कार्यालयामार्फत ते पराशर सोसायटीत वीजबिल भरणा न करणाऱ्या ग्राहकांची माहिती घेण्यासाठी गेले होते. महावितरणचे ग्राहक सुशील नवले यांनी वीजबिल भरले नव्हते. त्यामुळे त्यांचा वीजपुरवठा तोडण्यात आला. त्याचा राग आल्याने नवले यांनी घरातून स्टीलचा रॉड आणून त्याने इंडे यांना मारहाण केली. आमच्या भागात आला तर त्याचे हात-पाय तोडीन, अशी धमकीही त्याने दिली.

# बारामतीबाबत दिल्लीतून कोणत्याही प्रकारची तडजोड होणार नाही-केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन

## भारतीय जनता पक्षाने बारामती मोहीम हाती घेतली




।पुणे। महाईन्यूज ।

बारामती लोकसभा अंतर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदार संघातील बनावट मतदार कमी करा, केंद्राच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवा, बाहेरून नोकरी व व्यवसायानिमित्त आलेल्या मतदारांना संपर्क करून आपलेसे करा. कार्यकर्त्यांनी आतापासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या कामाला लागावे. बारामतीबाबत दिल्लीतून कोणत्याही प्रकारची तडजोड होणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात विजय मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्षाने बारामती मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बारामतीच्या दौऱ्यावर आल्या आहेत. तयारीला लागण्याच्या कार्यकर्त्यांना सूचना

बारामती लोकसभा मतदार संघाच्या मंडल अध्यक्ष आणि जिल्हा पदाधिकारी यांच्या संघटनात्मक कार्यक्रमात केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन बोलत होत्या. सीतारामन यांच्या भाषणाआधी बोलताना दौंडचे आमदार राहुल कुल यांनी आपले केंद्रीय नेते बारामतीमध्ये येऊन कौतुक करतात. त्या ठिकाणी नसलेल्या मॉडेलची वाहवा करतात. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. अशाने आपण बारामती कशी जिंकणार?. असा सवाल केला.

हा धागा पकडून पदाधिकाऱ्यांशी बोलताना सीतारामन म्हणाल्या, 'पक्षाच्या केंद्रीय स्तरावर आणि दिल्लीतून बारामतीबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड होणार नाही. त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी संभ्रमात राहू नये. आतापासून २०२४ च्या तयारीला लागा', अशा सूचनाही त्यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.

'मोदी सरकार २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर माझ्याकडे वाणिज्य व व्यापार खाते देखील होते. युरोपीय महासंघाने द्राक्ष उत्पादन घेताना रसायन वापराबाबत काही कठोर निर्णय २०१४ पूर्वीच घेतले होते. त्यामुळे निर्यातीला मर्यादा आल्या होत्या. युरोपीय महासंघाने या निर्णयाची अंमलबजावणी होण्यासाठी वेळ दिला होता. वास्तविक ही समस्या शरद पवार केंद्रीय कृषीमंत्री असताना निर्माण झाली होती. मात्र, त्यावर पवार यांनी काहीच केले नाही. पुणे जिल्ह्यातील शेतकरी घेऊन नितीन गडकरी माझ्याकडे आले होते आणि त्यानंतर मोदी सरकारने यावर तोडगा काढला.' असेही त्या म्हणाल्या.

### बारामतीतील समस्या आक्रमकपणे मांडा

**'बारामती लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतल्यानंतर माझ्या एक गोष्ट लक्षात आली, की आपला पक्ष बारामतीमध्ये बचावात्मक आहे. राष्ट्रवादीचे नेते भ्रष्टाचार केल्याने तुरुंगात गेले आहेत. बारामतीमधील कित्येक गावात पाण्याची समस्या आहे. हे प्रश्न आक्रमकपणे मांडा. यावर बोला, सोशल मीडियात मांडा, तरच मग लोक पुढे येतील. यासह बारामती जिंकण्यासाठी या लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या सहाही विधानसभा मतदारसंघातील बोगस मतदार कमी करा, पुणे जिल्ह्यात बाहेरून आलेल्यांना संपर्क करावा, प्रथम मतदारांसह नोकरी, व्यवसाय निमित्ताने या ठिकाणी आलेल्यांना संपर्क करावा. ते येथेच राहणार असल्यास त्यांना येथे मतदार करून घ्या, त्यांच्या समस्या वेगळ्या असतील त्या ओळखा आणि सोडवा. याचा फायदा पक्षाला होईल' अशा सूचना त्यांनी केल्या.**

### भाजपा जगातील सर्वात मोठा पक्ष

जगातील सर्वात मोठा पक्ष भाजपा आहे. मात्र, असे सांगण्याची मला आता भीती वाटते. कारण यामुळे काही प्रमाणात कार्यकर्ते निर्धास्त होण्याची भीती आहे. या ठिकाणचे काही बूथ कमजोर आहेत, ते मजबूत करा. बारामतीमधील प्रलंबित विकासकामांसाठी केंद्राकडून नक्की मदत करू, निधी देऊ, अशी ग्वाही सीतारामन यांनी यावेळी दिली.

# चांदणी चौकात साताऱ्याकडे जाणाऱ्या मार्गिकेला पर्यायी रस्ता करणार

## पर्यायी मार्गिका तयार झाल्याशिवाय पूल पाडता येणे अशक्य आहे, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

। पिंपरी ।। महाईन्यूज

चांदणी चौकात मुंबईहून साताऱ्याकडे जाणाऱ्या मार्गिकेला पर्यायी रस्ता करण्यासाठी हॉटेल बंजारा हिल्स येथील टेकडी फोडण्यात येत आहे. हे काम तातडीने करण्यासाठी या ठिकाणी बुधवारी नियंत्रित स्फोट करण्यात आले. चांदणी चौकातील जुना पूल नोएडा येथील जुळ्या मनोऱ्यांप्रमाणे पाडण्यात येणार आहे. मात्र, त्यासाठी महामार्ग काही तास बंद करावा लागणार आहे. सुरुंग लावून खडक फोडला

पूल तोडताना साताऱ्याकडे जाणारी वाहतूक सुरू राहावी, यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (नॅशनल हायवेज ॲथॉरिटी ऑफ इंडिया – एनएचएआय) पर्यायी रस्ता केला जात आहे. त्यासाठी जेसीबी आणि पोकलेनच्या मदतीने टेकडी फोडली जात आहे. मात्र, त्यात अधिक वेळ खर्ची पडत आहे. हे काम तातडीने करण्यासाठी बुधवारी कमी तीव्रतेचा सुरुंग लावून खडक फोडण्यात आला. यामुळे पर्यायी रस्ता लवकर होण्यास मदत होणार आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



### मुंबईला जाण्यासाठी एकच पर्यायी मार्ग

दरम्यान, चांदणी चौकातील जुना पूल पाडल्यानंतर १२ ते १५ तास वाहतुकीचा खोळंबा होणार आहे. सध्या कोथरूड, सातारा या रस्त्याने मुळशी, बावधन, मुंबईला जाण्यासाठी एकच पर्यायी मार्ग उपलब्ध आहे. मात्र, मुंबई, मुळशी, पाषाण आणि बावधनकडून कोथरूड, साताऱ्याकडे जाणाऱ्या वाहनांना पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. ही वाहतूक एकाच मार्गिकेने वळविल्यास वाहतूक कोंडी होईल, म्हणून पर्यायी मार्गिका तयार झाल्याशिवाय पूल पाडता येणे अशक्य आहे, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

## सण- उत्सव काळात महिला सुरक्षेबाबत उपाययोजना करा

# पिंपरी-चिंचवडकरांच्या सुरक्षेसाठी आ. लांडगे सरसावले!

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त अंकूश शिंदे यांना निवेदन

पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवडमधील सर्वसामान्य नागरिक, महिलांच्या सुरक्षेबाबत आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला असून, पोलीस प्रशासनाने सण- उत्सव काळातील कायदा- सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात अशी मागणी केली आहे.

याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त अंकूश शिंदे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसंख्या सुमारे २८ लाख इतकी आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाला शहरातील कायदा आणि सुव्यवस्था





अबाधीत राखण्यासाठी कायम सतर्क रहावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. गेल्या दोन वर्षांत कोविड महामारीमुळे सार्वजनिक सण-उत्सव साजरे झाले नाही. मात्र, यंदा सर्व सण-उत्सव निर्बंधमुक्त साजरे होत आहेत. गणेशोत्सवानंतर आता नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी असे उत्सव होणार आहेत. परिणामी, प्रमुख बाजारपेठा, वर्दळीचे चौक, सार्वजनिक कार्यक्रमांची ठिकाणांवर महिलांसह अबालवृद्धांची मोठी गर्दी असते. त्यादृष्टीने सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याची आश्यकता आहे.

सध्यस्थितीला गुन्हेगारी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सोनसाखळी चोरी, छेडछाडीचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाकडून नवरात्रोत्सवासह सण- उत्सावाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी महिला पोलीस, अधिकारी यांची गस्त वाढवणे अपेक्षीत आहे. मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्हीच्या माध्यमातून चुकीच्या कृत्यांवर 'वॉच'ठेवला पाहिजे. त्यासाठी नियंत्रण कक्षाचीही स्थापना करण्याची आवश्यकता आहे, असेही आमदार लांडगे म्हटले आहे.

### पोलीस अधिकारी- लोकप्रतिनिधी बैठक घ्या...

नवरात्रोत्सव हा आदिशक्तीचा उत्सव असल्याने महिलांची संख्या अधिक असते. देवीच्या आरतीनंतर खेळला जाणारा 'गरबा' तरुण-तरुणींमध्ये लोकप्रिय आहे. पोलिस यंत्रणेकडून वेळेची बंधने शिथिल झाल्यास रात्री उशिरापर्यंत गरबा रंगतो. त्यामुळे या उत्सवाला गालबोट लागू नये, यासाठी महिलांच्या सुरक्षेसाठी महिला सुरक्षारक्षक, विशेष पथकांची नेमणूक करण्याबाबत कार्यवाही करावी. त्यासाठी प्रशासकीय पातळीवर लोकप्रतिनिधी आणि पोलीस अधिकारी यांची बैठक घेण्यात यावी. त्यामध्ये उत्सव काळातील कायदा- सुव्यवस्था तसेच महिला सुरक्षेबाबत कार्यवाहीचे धोरण ठरवणे अपेक्षीत आहे, असेही आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे.

### उत्सवाला गालबोट लागू नये : आमदार लांडगे

उत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी महिलांना छेडछाड, लुटमार, गरोदर मातेला सुविधा, अचानक होणारे शॉर्ट सर्किट सारख्या गोष्टी थांबवण्यासाठी व नागरिकांना सुरक्षा देण्यासाठी पोलीस प्रशासनाला मदत म्हणून दक्षता समितीची स्थापना करावी. त्याद्वारे उत्सवाला गालबोट लागणार नाही, अशी भूमिका पोलीस प्रशासनाने ठेवावी, अशी आमची आग्रही मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

# स्मिता झगडे यांना स्वतःची कार्यपद्धती भोवली!

## स्मिता झगडे यांची नियुक्ती रद्द, प्रदीप जांभळे-पाटील यांची अतिरिक्त आयुक्तपदी वर्णी

पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उपायुक्त स्मिता झगडे यांची अतिरिक्त आयुक्तपदी झालेली नियुक्ती रद्द झाली आहे. त्यांच्याजागी वसई-विरार महापालिकेचे उपायुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची अतिरिक्त आयुक्तपदी वर्णी लागली. याबाबतचे आदेश राज्याच्या नगरविकास विभागाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी आज (गुरुवारी) काढले आहेत. दरम्यान, दहा दिवसांतच झगडे यांची नियुक्ती रद्द झाली असून त्या महापालिकेतच उपायुक्त पदावर कार्यरत राहतील, असे शासनाने स्पष्ट केले आहे.



**भारतीय रेल्वे सुरक्षा सेवेतील (IRPFS) विकास ढाकणे यांची 13 सप्टेंबर रोजी राज्य शासनाने महापालिका अतिरिक्त आयुक्तपदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणली. त्यांच्या सेवा त्यांच्या मूळ प्रशासकीय विभागाकडे प्रत्यार्पित केल्या. त्यांच्याजागी महापालिकेतच सहाय्यक आयुक्त म्हणून काम केलेल्या आणि आता उपायुक्त असलेल्या स्मिता झगडे यांची नियुक्ती केली होती. त्यानुसार झगडे यांनी अतिरिक्त आयुक्तपदाचा पदभार स्वीकारण्यासाठी प्रयत्न केले. झगडे यांनी टपालाने रुजू अहवाल आयुक्त कार्यालयाकडे पाठविलाही होता. पण, आयुक्तांनी रुजू अहवालावर स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे झगडे यांना पदभार स्वीकारता आला नाही. त्यानंतरही झगडे यांनी पदभार देण्यासाठी आयुक्तांकडे पाठपुरावा केला. राजकीय पातळीवरूनही प्रयत्न केले. परंतु, त्यांना त्यात यश आले नाही**

भारतीय रेल्वे सुरक्षा सेवेतील (IRPFS) विकास ढाकणे यांची 13 सप्टेंबर रोजी राज्य शासनाने महापालिका अतिरिक्त आयुक्तपदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणली. त्यांच्या सेवा त्यांच्या मूळ प्रशासकीय विभागाकडे प्रत्यार्पित केल्या. त्यांच्याजागी महापालिकेतच सहाय्यक आयुक्त म्हणून काम केलेल्या आणि आता उपायुक्त असलेल्या स्मिता झगडे यांची नियुक्ती केली होती. त्यानुसार झगडे यांनी अतिरिक्त आयुक्तपदाचा पदभार स्वीकारण्यासाठी प्रयत्न केले. झगडे यांनी टपालाने रुजू अहवाल आयुक्त कार्यालयाकडे पाठविलाही होता. पण, आयुक्तांनी रुजू अहवालावर स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे झगडे यांना पदभार स्वीकारता आला नाही. त्यानंतरही झगडे यांनी पदभार देण्यासाठी आयुक्तांकडे पाठपुरावा केला. राजकीय पातळीवरूनही प्रयत्न केले. परंतु, त्यांना त्यात यश आले नाही. आयुक्त शेखर सिंह आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

झगडे यांना रुजू करून घेण्यास भाजप शहराध्यक्ष, आमदार महेश लांडगे यांचा विरोध होता, असे बोलले जात होते. त्यामुळे झगडे यांची नियुक्ती रद्द होईल अशी चर्चा होती. अखेरीस आज झगडे यांची अतिरिक्त आयुक्तपदावरील नियुक्ती रद्द झाल्याचा आदेश महापालिकेत धडकला. झगडे या महापालिकेत उपायुक्त पदावर कार्यरत राहणार आहेत. त्यांच्याजागी राज्यकर विभागाचे आणि वसई-विरार महापालिकेचे उपायुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली असून त्यांची नियुक्ती दोन वर्षांसाठी असणार आहे. त्यांनी वसई-विरार महापालिकेतून उपायुक्त पदावरून कार्यमुक्त व्हावे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्तपदाचा पदभार स्वीकारावा. त्याचा अहवाल शासनास पाठवावा, असे आदेशात म्हटले आहे.

## संपादकीय »

# बुडत्याचा पाय खोलात...

***साम्राज्यवादी चीन, अराजकवादी बंडखोर, टपून बसलेले काही लष्करी अधिकारी, तमिळ बंडखोर संघटनांना दिसू लागलेली संधी, तिजोरीतील खडखडाट आणि रस्तोरस्ती फिरणारी भुकेकंगाल संतप्त प्रजा, अशा घनघोर संकटातून श्रीलंकेला कोण आणि कसे बाहेर काढणार, हा मोठा प्रश्न आहे.***

श्रीलंकेच्या बरबादीत सिंहाचा वाटा उचलणारे पदच्युत अध्यक्ष गोताबाया राजपक्षे सिंगापुरात पोहोचले आहेत. श्रीलंका बुडाली तरी चालेल, राजपक्षे कुटुंब तरले पाहिजे, असा काही डाव असलाच, तर तो तिथल्या न्यायव्यवस्थेने तूर्त तरी उधळून लावला आहे. गोताबाया यांच्या सरकारमध्येच असणाऱ्या इतर दोन भावांना देश सोडून जाता येणार नाही, असा आदेश न्यायालयाने बजावला आहे. दरम्यान, कालपर्यंत राजपक्षे यांच्या ओंजळीने पाणी पिणारे पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांच्यावर हंगामी अध्यक्ष बनून देशाचा गाडा पुढे नेण्याची अत्यंत अवघड कामगिरी येऊन पडली आहे. त्यांनी काम सुरू करताच, 'काही फॅसिस्ट शक्ती देशात असंतोष माजविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि तो खपवून घेतला जाणार नाही,' असा इशारा दिला आहे. कोणत्याही राज्यकर्त्याला असे म्हणावेच लागते; तसेच नागरिक क्रोधित होऊन रस्त्यांवर उतरतात, तेव्हा त्यांच्या हातात जळते पलिते देणारे किंवा शक्य झाले तर बंदुकाही सोपविणारे तयार असतात. हे जगभरात घडत आले आहे. श्रीलंकेसारख्या देशात आधी असंतोष माजावा आणि नंतर हा देश आपला अंकित होऊन आपल्या मर्जीने हाकता यावा, हे स्वप्न काही केवळ चीन पाहात असेल, असे नाही. हिंदी महासागरातील श्रीलंकेचे अनन्य स्थान लक्षात घेता, आज ना उद्या तेथे आपला तळ असावा, असे कोणत्याही जागतिक शक्तीला वाटू शकते. आपले स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व राखण्याचे असे आव्हान तमिळी वाघांचे बंड ऐन भरात असतानाही कधी श्रीलंकेसमोर उभे ठाकले नव्हते. आधीची सर्व कर्जे थकलेली. व्याजही देता येत नाही. जगातून आवश्यक गोष्टी येत नाहीत आणि परकीय चलन मिळवून देणारी निर्यात पूर्ण थांबलेली, अशा भयंकर कोंडीत हा भारताच्या तुलनेत चिमुकला देश सापडला आहे. दुर्दैवाने, श्रीलंकेला संकटातून बाहेर काढण्यासाठी जागतिक वित्तसंस्थांनी ज्या वेगाने हालचाली करायला हव्या होत्या, तशा त्या होताना दिसत नाहीत. भारताने मोठ्या प्रमाणात मदत देऊ केली असली आणि तांदूळ व इतर चिजा पाठविल्या असल्या, तरी श्रीलंकेला या खाईतून बाहेर काढण्याची जबाबदारी अजून तरी घेतलेली दिसत नाही. कदाचित, या सत्तांतरानंतर भारताची भूमिका बदलू शकेल. नव्या सरकारशी मदत देण्याबाबत काही करार-मदार करून मग यात उतरावे, असाही विचार चालू असेल; मात्र श्रीलंकेला वाचविणे, हे भारताचे नैतिक कर्तव्यच आहे. या भूमीशी भारताचे काही हजार वर्षांचे संबंध आहेत.



## आनंदी सकाळ

# म्हणून श्री स्वामी समर्थ अवतरले...

काळचक्राच्या निरंतर भ्रमणगतीत वेळोवेळी भारतीय समाज उत्कर्षाकडून अपकर्षाकडे, उन्नतीकडून अवनीतीकडे जाताना दिसतो. अध:पतन व अराजकतेच्या वातावरणात माणसातील चैतन्य जागवण्यासाठी, मूल्ये अधिक कार्यप्रवृत्त करण्यासाठी ईश्वर अवतरित होऊन धर्माच्या जीवनरहाटीतून काळानुरूप कर्म, भक्ती व ज्ञानाचा प्रसार करतो. अकराव्या ते सतराव्या शतकाच्या समाप्तीपर्यंत संपूर्ण भारतात भक्तीची, आचार्यांच्या ज्ञान-नेतृत्वाची लहर उचंबळली. भक्तीच्या छत्राखाली संतांनी समाजाला एकत्र करून मानसिक खंबीरता, धैर्य दिले. लढण्याचे बळ दिले. समाजजीवनात त्यांनी सर्व उत्तम तत्त्वांचा मेळ घालता येईल, अशी शिकवण दिली. महाराष्ट्रात याचे सुंदर पडसाद छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाच्या रूपाने स्वधर्माच्या आनंदाच्या रूपाने उमटले.

# प्रतिमानिर्मिती हे या खेळाचे साध्य...



## भूमिका



कर्नाटकच्या सत्ताधाऱ्यांनी राजकारणातील एका नेहमीच्या खेळाचा नवा डाव सुरू केला आहे. धर्म, परंपरा, शिक्षण, खाण्यापिण्याच्या सवयी व आवडी.. या कशाचेही राजकीयीकरण करण्याचा हा खेळ अर्थातच जुना आहे. राजकीयीकरणाच्या या खेळात मुरलेले खेळाडू तर म्हणतील की, हा खेळ काँग्रेसनेच सुरू केला, तोही गांधी वा नेहरूंनीच. खरेही असेल त्यांचे. हा खेळच असा मायावी. राजकीयीकरणाच्या या खेळात कोणतेही विधान हे मानले तर- आणि तरच- सत्य. या खेळाचे नियम तसे साधे. पत्त्यांच्या एखाद्या खेळात हुकमाची सर्वाधिक पाने आपल्याचकडे असल्याचा अंदाज बांधून हुकूम जाहीर केला जातो, तसाच पण थोडय़ा निराळय़ा पद्धतीने हा खेळ खेळला जातो. हा फरक असा की, आपण सत्ताधारी असलो वा नसलो तरी आपलेच म्हणणे खरे असल्याचे सांगणारे लोक आपल्या बाजूने आहेत, याचा अंदाज आधी बांधला जातो. 'काय चूक काय आहे त्यात?' असा प्रश्न आक्रमकपणे विचारून हे लोक जणू काही आपले म्हणणे बिनचूक असल्याचा भास उत्पन्न करू शकतात, बाजू पडत असल्यास 'यावर एवढा का वाद घालता?' असे तरी शहाजोगपणे विचारणारे लोक आपल्याकडे आहेत, याची खात्री करून मगच या खेळाचा डाव सुरू केला जातो. प्रतिमानिर्मिती हे या खेळाचे साध्य, पण मोबाइलमधील खेळांमध्ये जशा अधिकाधिक वरच्या पातळय़ा- लेव्हल्स- असतात तसा हा खेळसुद्धा प्रतिमानिर्मितीपासून ते दबदबा, मग त्या मताची अघोषित आणि सर्वमान्य अशी दहशत, या दहशतीलाच जणू नैतिक अधिसत्ता समजणे आणि अखेर इतिहास वगैरे घडवून अजरामर वगैरे होणे अशा पातळय़ा गाठू शकतो. या खेळातले प्रतिस्पर्धी म्हणजे सहमत नसणारे सारे जण. त्यांची संख्या कमी करणे हा या खेळाचा हेतू पहिल्या पातळीला नसतो, पण 'नैतिक अधिसत्ते'च्या पातळीला प्रतिस्पर्धी संपवावेच लागतात आणि त्याची सुरुवात या टीकाकारांच्या दानवीकरणापासून होते. कर्नाटकचा नवा डाव नुकता सुरू झाला, पण तो कुठल्याही पातळीला जाऊ शकतो.

उदाहरणार्थ आता कर्नाटक सरकार केंद्र सरकारला सांगते आहे की, नव्या राष्ट्रव्यापी शिक्षण धोरणाचा भाग म्हणून शाळांमध्ये मनुस्मृती शिकवा. किंवा हेच राज्य म्हणते आहे की, पायथागोरस आणि न्यूटन यांच्या नावाने पसरवल्या गेलेल्या भाकडकथा -'फेक न्यूज'- आता संपवल्या पाहिजेत. हे एरवी धक्कादायक. पण यावर राजकीयीकरणाच्या खेळातली भूमिका अगदी स्पष्ट असणार आणि त्या भूमिकेत वरकरणी काहीच खोट नसणार, हे नक्की. या नव्या डावाला राष्ट्रव्यापी रूप आहे. केंद्र सरकारचा भाग असलेल्या 'राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदे'ने (एनसीईआरटी) सर्व राज्यांकडून नव्या शिक्षण धोरणाबद्दल सूचना मागवल्या. त्यावर आमच्या राज्यात हे धोरण आधीच लागू झाले असल्याचा दावा करणाऱ्या कर्नाटकने, तब्बल २६ अभ्यासगटांच्या सूचना पाठवल्या. या २६ गटांनी प्रत्येकी सात सूचना केल्या असे मानले तरी १८२ सूचना!

# आकाशवाणी ते द्वेषवाणी

**गेल्या तीन दशकांत भारतात चढत्या क्रमाने माध्यमक्रांती झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ मध्ये पहिल्या अर्थसंकल्पाने कालबाह्य कायदेकानूंचे साखळदंड तोडून फेकून दिले**

अर्थस्वातंत्र्याचा त्यानंतर जो झंझावात आला, तो सर्व क्षेत्रांप्रमाणे माध्यमांच्याही अपार विस्ताराला कारणीभूत ठरला. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव हे किती विद्वान होते, हे वेगळे सांगायला नको.

गेल्या तीन दशकांत भारतात चढत्या क्रमाने माध्यमक्रांती झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ मध्ये पहिल्या अर्थसंकल्पाने कालबाह्य कायदेकानूंचे साखळदंड तोडून फेकून दिले. अर्थस्वातंत्र्याचा त्यानंतर जो झंझावात आला, तो सर्व क्षेत्रांप्रमाणे माध्यमांच्याही अपार विस्ताराला कारणीभूत ठरला. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव हे किती विद्वान होते, हे वेगळे सांगायला नको. दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या निर्बंधमुक्त विस्ताराला नकळत इतकी चालना द्यावी का, असा प्रश्न त्यांना तेव्हाच पडला. मात्र, भारतीय 'ग्लासनोस्त' आणि 'पेरेस्त्रोयका'च्या शिलेदारांनी रावांना विरोध केला. शिवाय, काँग्रेसच्या डोक्यावर आणीबाणीतील 'सेन्सॉरशिप'च्या पापाचा घडा होताच. तो आणखी भरणे योग्य ठरले नसते. मात्र, वृत्त आणि मनोरंजन वाहिन्या तसेच त्यांच्याही शतपावले पुढे गेलेल्या



समाज माध्यमांचे स्वरूप पाहिले तर नरसिंहराव द्रष्टे होते, असे म्हणावे लागेल. गेल्या दोन वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांच्या निमित्ताने सर्व प्रकारच्या माध्यमांना वारंवार धारेवर धरले आहे. आताही अनेक याचिकांची सुनावणी एकत्रित करताना सर्वोच्च न्यायालयाने 'समाजात तिरस्कार आणि द्वेषभावना पसरवू नका,' असा सज्जड इशारा वृत्तवाहिन्यांना दिला. आज भारतात चारशेहून अधिक वृत्तवाहिन्या आहेत. तर्कबुद्धी खुंटीवर टांगायला लावणाऱ्या शेकडो मनोरंजन वाहिन्या निराळ्याच. या सर्वभाषी वृत्तवाहिन्या एखाद्या जागृत ज्वालामुखीतून लाव्हारस उकळून ओसंडत असावा; तशा दिवसाच्या २४ तास बातम्या ओकत असतात. या बातम्या प्रामुख्याने हिंसाचाराच्या असतात. रासवट गुन्ह्यांच्या असतात. भावना भडकविणाऱ्या असतात. काट्याचा नायटा करणाऱ्या असतात. दोन समाजांमध्ये तिरस्कार पेरणाऱ्या असतात. कलागती लावणाऱ्या असतात. भांडणे वाढविणाऱ्या असतात आणि द्वेषभाव पेटविणाऱ्या असतात. वृत्तवाहिन्यांच्या या वर्तनाचे अधोरेखन सर्वोच्च न्यायालयानेच अत्यंत कडक निरीक्षणे नोंदवत केले आहे. न्यायालयाने केंद्र सरकारलाही सवाल केला आहे की, तुम्ही यात काही करणार आहात की नाही? भारतीय राज्यघटनेत वेगळे माध्यम स्वातंत्र्य नाही. प्रत्येक नागरिकाच्या उच्चार आणि आविष्कार स्वातंत्र्यातच माध्यमांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अनुस्यूत आहे. मात्र, नागरिकांच्या स्वातंत्र्याला कर्तव्य आणि जबाबदारीच्या सक्तीची वेसण जशी लावता येत नाही; तशीच वाहिन्यांच्या अनिर्बंध स्वातंत्र्याला अडसर घालता येत नाही. या विचित्र स्थितीचा देशातील सर्वभाषिक वृत्तवाहिन्या गैरफायदा घेत असून आपल्या गल्लाभरू वर्तनाने समाजातील शांतता, सद्भावना, स्थैर्य यांचा बळी देत आहेत. खंडपीठाने ज्या याचिका एकत्रित केल्या आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥१॥
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उद्धव ठाकरे खोटारडे अन् लबाड : नारायण राणे

## शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल

।मुंबई ।महाईन्यूज।

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची दिल्लीत पत्रकार परिषद झाली. त्यावेळी नारायण राणे यांनी शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे हे पहिले मंत्र्यांची बैठक घेत होते. त्यानंतर खासदार, आमदार आणि आता गटनेत्यांची बैठक घेत आहेत. उद्धव ठाकरे आता गटनेत्यांच्या बैठकीपर्यंत पोहोचले आहेत. त्यावेळी या बैठकीत त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी गोरेगावच्या नेस्को संकुलात झालेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात भाजपावर टीका केली. त्यावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. "यांच्या एवढा खोटारडा माणूस मी पाहिला नाही, सतत खोटं बोलत राहतात, युती असताना अमित शाहांना फोन करत होते. उद्धव ठाकरे हे जगातले ढ माणूस आहेत",



अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची दिल्लीत पत्रकार परिषद झाली. त्यावेळी नारायण राणे यांनी शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. "उद्धव ठाकरे हे पहिले मंत्र्यांची बैठक घेत होते. त्यानंतर खासदार, आमदार आणि आता गटनेत्यांची बैठक घेत आहेत. उद्धव ठाकरे आता गटनेत्यांच्या बैठकीपर्यंत पोहोचले आहेत. त्यावेळी या बैठकीत त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. गटनेता हा ठाराविक विभागाचा प्रमुख असतो आणि त्यांच्यासमोर केंद्र सरकार आणि अमित शाहा यांच्याबद्दल उद्धव ठाकरे काय बोलले, त्यावेळी त्यांचे भाषण बघता नैराश्येतून भाषण केल्यासारखे वाटले. मुख्यमंत्रीपद गेले म्हणून भाषण केले", असे नारायण राणे यांनी म्हटले. "मेळाव्यात एक खुर्ची खाली होती, संजय राऊत असे नाव लिहिले होते. संजय राऊत हे जेलमध्ये असताना सभेला त्यांची खुर्ची ठेवण्यात आली. त्यांच्याबद्दलही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. उद्धव ठाकरे यांना अमित शहा यांचा दौरा एवढा का झोंबला, अमित शाहा हे देशाचे गृहमंत्री ते देशभरात कुठेही जाऊ शकतात, उद्या महापालिका निवडणुका लागल्या, तर तिथेही ते येऊ शकतात. तुम्हाला झोंबायचे कारण काय?", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. "अमित शाहा हे मुंबई दौऱ्यावर असताना त्यांना जमिन दाखवा असे म्हणले होते. पण अमित शाहांचा बोलण्याचा अर्थ यांना कळला नाही. त्यांना जमिनीवर या असे म्हणायचे होते. आता म्हणताहेत आसमान दाखवू. कोणाच्या जीवावर आसमान दाखवू बोलत आहात उद्धव ठाकरे. शिवसेनेचा जन्म झाला 19 जून 1966 तेव्हा तुम्ही 6 वर्षांचे होता. तेव्हा तुम्ही कुठेच नव्हता. तुम्ही 39 व्या वयात जेव्हा मी मुख्यमंत्री होतो. तेव्हा तुम्ही राजकारणात आलात. त्याच्याआधी तुम्ही शिवसेनेत सक्रिय नव्हते. बरीच आंदोलने झाली तेव्हा तुम्ही कुठे होता. आतापर्यंत कोणाच्या कानशिलात लगावली", असे नारायण राणे यांनी म्हटले. "उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री झाले, तेव्हा मी म्हणालो होतो, की हे आयत्या बिळावर नागोबा आहेत. शिवसेनेच्या संघर्षाच उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे कुठेच नाहीत", असेही नारायण राणे यांनी म्हटले. "खोक्याचे काय बोलता आहात, तुम्हीच खोके खाल्ले सगळे सांगत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह यशवंत जाधव यांनी सांगितले, तुम्ही खोके कसे खाल्ले. कुणी, कुणे कसे खोके दिले हे संगळं सांगत आहेत", असे नारायण राणे यांनी म्हटले. "तुमची औकात आहे का?, तुम्ही काय केलंत, तीन दिवस केवळ मंत्रालयात बसले. जेलमध्ये असणाऱ्या संजय राऊतांची खुर्ची सभेला खाली ठेवली. हिंदुत्वासाठी कोणता त्याग केला. हिंदुत्वाच्या नावावर यांनी घर चालवलं. छत्रपती शिवजी महाराजांच्या नावावर शिवसेना चालवली. एकतरी काम छत्रपती शिवाजी महाराज्यांसाठी केले का?", असे प्रश्न उपस्थित करत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे आणि मातोश्रीवर हल्लाबोल केला. "यांच्या एवढा खोटारडा माणूस मी पाहिला नाही, सतत खोटं बोलत राहतात, युती असताना अमित शाहांना फोन करत होते. उद्धव ठाकरे हे जगातले ढ माणूस आहेत. उद्धव ठाकरे खोटारडे आहेत, लबाड लांडगा आहेत, खोटारडे माणूस आहे", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले.

### उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला

बैठकीत त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. गटनेता हा ठाराविक विभागाचा प्रमुख असतो आणि त्यांच्यासमोर केंद्र सरकार आणि अमित शाहा यांच्याबद्दल उद्धव ठाकरे काय बोलले, त्यावेळी त्यांचे भाषण बघता नैराश्येतून भाषण केल्यासारखे वाटले. मुख्यमंत्रीपद गेले म्हणून भाषण केले", असे नारायण राणे यांनी म्हटले. "मेळाव्यात एक खुर्ची खाली होती, संजय राऊत असे नाव लिहिले होते. संजय राऊत हे जेलमध्ये असताना सभेला त्यांची खुर्ची ठेवण्यात आली. त्यांच्याबद्दलही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. उद्धव ठाकरे यांना अमित शहा यांचा दौरा एवढा का झोंबला, अमित शाहा हे देशाचे गृहमंत्री ते देशभरात कुठेही जाऊ शकतात, उद्या महापालिका निवडणुका लागल्या, तर तिथेही ते येऊ शकतात. तुम्हाला झोंबायचे कारण काय?", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

# सोलापुरात शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची जम्बो कार्यकारिणी जाहीर

## शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्रे प्रदान



।सोलापूर। ।महाईन्यूज।

सोलापुरात शिवसेनेच्या शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची जंम्बो कार्यकारिणी गुरुवारी जाहीर करण्यात आली. शासकीय विश्रामगृह येथे युवा सेनेचे राज्य सचिव किरण साळी आणि सोलापूरचे शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्रे प्रदान करण्यात आली. सोलापूरचे संजय तुकाराम सरवदे यांची शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर विष्णू बरगंडे, प्रकाश शिंदे, विशाल कल्याणी, अंकुश राठोड आणि आशिष परदेशी यांची शिवसेनेचे उपशहर प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर विभाग प्रमुख म्हणून राजू बिडला यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच बाळासाहेब दिलीप निकम हे मंगळवेढा तालुका युवा सेनेचे प्रमुख असतील. अमोल गायकवाड माढा तालुका युवा सेनेचे प्रमुख म्हणून काम पाहतील. तर दीपक खटकाळे हे सांगोला तालुका युवा सेनेचे प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत .उपजिल्हाप्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आलेले संजय सरवदे हे संभाजी आरमारचे माजी जिल्हाप्रमुख आहेत. त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. युवा सेनेच्यासुद्धा निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.सांगोलाचे सागर सुभाष पाटील हे युवा सेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख राहणार आहेत. सोलापूर महापालिकेचे शिवसेनेचे नगरसेवक उमेश ईश्वर गायकवाड यांच्यावर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. उत्तर सोलापूर, संपूर्ण शहर आणि मंगळवेढा असे त्यांचे कार्यक्षेत्र आहे.

### राज्यभर विस्तार होणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून राज्यभरात विकासात्मक कामाच्या माध्यमातून पाऊल टाकण्यात येत आहे. राज्याला एका नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांची टीम कामाला लागली आहे. आगामी काळात शिंदे गटाच्या माध्यमातून राज्यभर विकास कामांचा जोर आणखीनच वाढणार आहे. सोलापूर जिल्ह्यातसुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून विविध योजना साकारण्यासाठी शिवसेना कटिबद्ध राहणार आहे .सर्व क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालण्यात येणार असल्याचे सांगतानाच नूतन पदाधिकाऱ्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था डोळ्यासमोर ठेऊन आपापल्या भागात बांधणी करावी असे शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.

# "कोणी मैदान देतं का...", गजानन काळेंनी शिवसेनेला डिवचलं

।मुंबई ।महाईन्यूज।



शिवाजी पार्कवर यंदा दसरा मेळावा घेण्यास मुंबई महापालिकेने शिवसेना आणि शिंदे गटाला परवानगी नाकारली आहे. या मैदानावर मेळावा घेतल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता असल्याने महापालिकेने ही परवानगी नाकारली आहे. मात्र, शिवाजी पार्कवरच दसरा मेळावा घेणार, असा निर्धार शिवसेनेने केला आहे. यावरून आता मनसेने शिवसेनेला डिवचलं आहे. "कोणी मैदान देतं का मैदान, अशी म्हणण्याची वेळ शिल्लक सेनेवर आली आहे. ज्यांनी गेली अडीच वर्षे फेसबूकवर राज्य कारभार पाहिला, त्यांना आता टोमणे मेळावासुद्धा शिवतीर्थावर घेता येणार नाही. हा मेळावा फेसबूकवर घेण्याची वेळ शिल्लक सेना प्रमुखांवर आली आहे. महाराष्ट्र टोमणे मेळाव्याच्या माध्यमातून चला हवा येऊ द्याचा प्रयोग आणि मनोरंजनाला मुकेल," असा टोमणा मनसेचे नेते गजानन काळे यांनी मारला आहे.पवार यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांवर स्पष्टीकरण दिलं. शरद पवार जेव्हापासून राज्याच्या राजकारणात आले तेव्हापासून त्यांनी आतापर्यंत १० ते २० हजार बैठका घेतल्या आहेत. राज्यात असा एकही प्रकल्प नाही, ज्यासाठी शरद पवार यांनी बैठक घेतलेली नाही. बैठका घेणं हे सरद पवार यांना नवं नाही. शरद पवार यांनी १४ ऑगस्ट २००६ रोजी एक बैठक घेतली होती. गृहनिर्माण खात्याशी संबंधित असलेले नेते या बैठकीला उपस्थित होते. पत्रा चाळचा प्रकल्प १९८८ पासून रखडलेला होता, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. पत्राचाळ प्रकरणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी मंगळवारी केली.

## शॉर्ट न्यूज »

### मेक्सिकोमध्ये अंदाधुंद गोळीबार, १० जणांचा मृत्यू



।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मेक्सिकोमध्ये गोळीबारात १० जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गुरुवारी बंदूकधारी व्यक्तीने सेंट्रल मेक्सिकोमधील एका बारमध्ये अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात १० लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मे महिन्यातही अशीच घटना घडली होती. मेक्सिकोच्या मध्य शहरातील हॉटेल आणि दोन बारमध्ये करण्यात आलेल्या गोळीबारात १० लोकांनी जीव गमावला होता.

स्टेट अॅटर्नी जनरल ऑफिसने दिलेल्या माहितीनुसार, सेंट्रल मेक्सिकोमध्ये मार्च महिन्यात १९ लोकांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. अनेकजण जखमी होते, ज्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. जानेवारी महिन्यात एकाच कुटुंबातील सहा जणांची

# इराणमध्ये हिजाबविरोधी आंदोलन पेटले!

## पोलीस कारवाईत 31 जणांचा मृत्यू, मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट

।तेहरान ।महाईन्यूज ।

इराणच्या सदाचार पोलिसांच्या (Iran Morality Police) ताब्यातील महिलेचा मृत्यू झाल्याने मोठा वादंग निर्माण झाला आहे. या घटनेवरून गेल्या अनेक दिवसांपासून निदर्शने सुरू असून पोलिसांच्या हिंसक कारवाईत सुमारे 31 जणांचा मृत्यू झाला आहे. निदर्शने अधिक तीव्र होत असल्याने इराणने इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअॅप ब्लॉक केले आहे. तर, काही ठिकाणी इंटरनेट वापरावर बंधने आणली आहेत.

इराणमध्ये हिजाब परिधान केला नाही म्हणून महसा अमिनी या 22 वर्षीय तरुणीला 13 सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती. परंतु तीन दिवसांनंतर कारागृहात बेशुद्ध झाल्याने तिला रुग्णालयात नेण्यात आले. पण रस्त्यातच तिचा मृत्यू झाला. पोलिसांच्या छळामुळे तिचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. पण ती आजारी होती आणि आम्ही तिला रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला, असे पोलिसांचे म्हणणे आहे. पण तिचा



**मात्र, या घटनेमुळे आठवडाभरापासून येथील वातावरण तापले आहे. ड्रेस कोड कायद्याच्याविरोधात प्रामुख्याने महिला रस्त्यावर उतरल्या असून त्या हिजाबची जाहिररीत्या होळी करत आहेत. तर, काही महिला आपले लांब केस कापून निषेध व्यक्त करीत आहेत. तेहरानमध्ये सुरक्षा रक्षकांबरोबर या आंदोलकांचे संघर्ष सुरू आहेत. त्यात जवळपास 31 जणांना जीव गमवावा लागला आहे. हे ध्यानी घेऊन प्रशासनाने इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअॅप सेवा ब्लॉक केली आहे. विशेष म्हणजे, फेसबुक, ट्विटर, टेलिग्राम, युट्यूब आणि टिकटॅक यासह अन्य सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इराणने ब्लॉक केले आहेत. त्यामुळे केवळ इन्स्टाग्राम व व्हॉट्सअॅप या दोनच अॅपचा सर्वाधिक**

मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे स्पष्ट झालेले नाही. मात्र, या घटनेमुळे आठवडाभरापासून येथील वातावरण तापले आहे. ड्रेस कोड कायद्याच्याविरोधात प्रामुख्याने महिला रस्त्यावर उतरल्या असून त्या हिजाबची जाहिररीत्या होळी करत आहेत. तर, काही महिला आपले लांब केस कापून निषेध व्यक्त करीत आहेत. तेहरानमध्ये सुरक्षा रक्षकांबरोबर या आंदोलकांचे संघर्ष सुरू आहेत. त्यात जवळपास 31 जणांना जीव गमवावा लागला आहे. हे ध्यानी घेऊन प्रशासनाने इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअॅप सेवा ब्लॉक केली आहे. विशेष म्हणजे, फेसबुक, ट्विटर, टेलिग्राम, युट्यूब आणि टिकटॅक यासह अन्य सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इराणने ब्लॉक केले.

# कुठे नेऊन ठेवताय देश माझा? विखारी प्रचाराचे 'मूक साक्षीदार' होऊ नका!

## सर्वोच्च न्यायालयाचे मोदी सरकारला खडे बोल

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील वादविवाद कार्यक्रमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या द्वेषपूर्ण भाषणांबाबत (द्वेषोक्ती) सर्वोच्च न्यायालयाने नाराजी जाहीर केली आहे. आपला देश नेमका कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावेळी माध्यमांसाठी नियमावली हवी असंही मत व्यक्त केलं. तसंच क्षुल्लक मुद्दा म्हणत सरकार मूक दर्शक का झाले आहे? असा सवाल न्यायालयाने केला.



वृत्तवाहिन्यांवरील द्वेषोक्तीपूर्ण भाषेसंदर्भात दाखल झालेल्या एकूण ११ याचिकांवर न्या. के एम जोसेफ आणि न्या. हृषिकेश रॉय यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी झाली. यामध्ये सुदर्शन न्यूज टीव्हीवर दाखवण्यात आलेला 'युपीएससी जिहाद' कार्यक्रम, धर्मसंसदेतील भाषणं यांचा समावेश होता. तसंच कोविड साथीच्या आजाराला जातीयवादी ठरवणाऱ्या सोशल मीडिया संदेशांचे नियमन करणाऱ्या याचिकांचाही समावेश होता. सुनावणी सुरु झाल्यानंतर न्यायमूर्ती जोसेफ यांनी, भारतात द्वेषयुक्त भाषणांसंबंधी कायद्यात काय तरतूद आहे? अशी विचारणा केली. याचिकाकर्त्यांपैकी एक वकील अश्विनी कुमार उपाध्याय यांनी न्यायालयाला निवडणूक आयोगाकडून उत्तर प्राप्त झालं असल्याची माहिती दिली. विशिष्ट तरतुदींचा समावेश असलेल्या काही दुरुस्त्या आवश्यक असल्याचं सुचवण्यात आलं असल्याचं त्यांनी सांगितलं. कायद्यामध्ये द्वेषयुक्त भाषण आणि अफवा पसरवण्यासंबंधी स्पष्ट व्याख्या नाही, असंही त्यांनी कोर्टाला सांगितलं.

न्यायमूर्ती जोसेफ यांनी केंद्र सरकारकडेही याप्रकरणी उत्तर मागितलं आणि आपण मूक साक्षीदार का झालेला आहात? अशी विचारणा केली.

# 'एक व्यक्ती एक पद' धोरणाचा राहुल गांधींकडून पुनरुच्चार

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या हालचाली होत आहेत.अशातच राहुल गांधी(rahul gandhi) यांची सुद्धा भारत छोडो यात्रा सुरु आहे. आज राहुल गांधी यांनी काँग्रेसमध्ये 'एक व्यक्ती एक पद'ला पाठिंबासुद्धा दर्शवला आहे. काँग्रेस(congress) अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर असलेले राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांना दुहेरी भूमिका बजावण्यासाठी दोन पदं मिळू शकत नाहीत. यापूर्वी, गेहलोत असे म्हणाले होते की, ते राजस्थानचे मुख्यमंत्री आणि अध्यक्ष या दोन्ही पदांवर कायम राहू शकतात. "आम्ही उदयपूरमध्ये एक वचनबद्धता केली आहे, मला आशा आहे की ती कायम राखली जाईल," असं राहुल गांधी केरळमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले. या पदाच्या उमेदवारांना सल्ला देताना ते म्हणाले की, काँग्रेस अध्यक्षपद हे एक वैचारिक पद आहे. भारताचा

### गेहलोत यांना धक्का



दृष्टिकोन मांडणारं हे पद आहे. अशोक गेहलोत(ashok gehlot) हे काँग्रेसचे अध्यक्ष होण्यासाठी गांधी कुटुंबाने संमती दर्शविण्याची सुद्धा बोलले जाते. पण असं असलं तरीही अशोक गेहलोत राजस्थानचे मुख्यमंत्री पद सोडण्यास तयार नाहीत. जरा त्यांना राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सोडले तर त्या जागी सचिन पायलटच्या विराजमान होतील. अशी भितीही अशोक गेहलोत यांच्या मनात आहे. सचिन यांनी बंडखोरी केल्यामुळे 2020 साली त्यांचे सरकार पडता पडता वाचले होते. काँग्रेसने या वर्षाच्या सुरुवातीला राजस्थानच्या उदयपूरमध्ये 'एक व्यक्ती एक पद' हा नियम स्वीकारला, त्यात तीन

# 'लायगर' चित्रपटाच्या अपयशामुळे अनन्या पांडेच्या करिअरवर परिणाम

बॉलीवूड स्टार्स सध्या त्यांच्या चित्रपटांबद्दल 'बॉयकॉट बॉलिवूड' ट्रेंडमुळे गेले काही दिवस खूप चिंतेत आहेत. आतापर्यंत बरेच बिग बजेट चित्रपट प्रेक्षकांना आकर्षित करण्यात अपयशी ठरले आहेत. अगदी आमिर खान, अक्षय कुमार यांच्या चित्रपटांनाही प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिलेला नाही. चित्रपटांच्या अयशस्वी कामगिरीमुळे अनेक कलाकारांचे करिअर पणाला लागले आहे आणि त्यातील एक म्हणजे अभिनेत्री अनन्या पांडे. अनन्याने चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवल्यापासून तिच्याकडे अनेक चित्रपटांच्या ऑफर्स येत होत्या. परंतु तिने काम केलेला एकही चित्रपट फारशी चांगली कामगिरी करू शकला नाही. तर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला तिचा 'लायगर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच आपटला. त्यानंतर आता अनन्यावर वाईट दिवस असल्याचे दिसत आहे.

बॉलीवूड स्टार अनन्या पांडेने तेलगू सुपरस्टार विजय देवरकोंडा याच्या पॅन इंडिया चित्रपट 'लायगर'मध्ये प्रमुख भूमिका साकारली. या चित्रपटाचे प्रमोशन बघता या चित्रपटाकडून सर्वांनाच मोठ्या अपेक्षा होत्या. या चित्रपटाची गाणी, ट्रेलर आणि टीझर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. पण त्यानंतर हा चित्रपट थिएटरमध्ये चालला नाही. परिणामी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर खूप कमी रकमेची कमाई केली. कोणताही दक्षिणात्य चित्रपट साइन करण्यापूर्वी अनन्याला लायगरचे यश पाहायचे होते. जेणेकरून ती तिच्या पुढच्या चित्रपटासाठी मोठ्या रकमेची मागणी करू शकेल. 'लायगर' रिलीज होण्याची वाट बघत अनन्याने कोणताही चित्रपट साइन केला नाही. 'लाइगर' हिट होताच अनन्या तिच्या मानधनात वाढ करून ते 4 कोटी करणार होती, असे म्हटले जात आहे. मात्र, असे काहीही झाले नाही आणि बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट चांगलाच आपटला.



# अमृता खानविलकरने सांगितली माधुरी दीक्षितची खास आठवण

मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून अमृता खानविलकरला ओळखलं जातं. अनेक मालिका आणि चित्रपटामुळे ती नेहमीच चर्चेत असते. तिच्या कसदार अभिनयासोबतच ती फार उत्कृष्ट नृत्यांगणाही आहे. 'वाजले की बारा', 'चंद्रा' यासारख्या असंख्य तिची गाणी गाजली. ती 'झलक दिखला जा' या रिॲलिटी शोचा भाग बनली आहे. या स्पर्धेत ती स्पर्धक म्हणून सहभागी झाली आहे. या शोच्या परीक्षकाच्या भूमिकेत अभिनेत्री मधुरी दीक्षित असते. नुकतंच अमृता खानविलकरने माधुरी दीक्षित तिला का आणि कधीपासून आवडते याबद्दल भाष्य केले.



बॉलिवूडमधील यशस्वी अभिनेत्रींचं नाव जेव्हा घेतलं जातं तेव्हा माधुरी दीक्षितचं नाव अव्वल स्थानावर येते. आपल्या सौंदर्याने आणि नृत्याने चाहत्यांच्या मनावर राज्य करणारी 'धक धक गर्ल' म्हणून माधुरी दीक्षितला ओळखले जाते. माधुरी दीक्षितने आतापर्यंत अनेक हिट चित्रपटात काम केले आहे. सध्या अमृता खानविलकर ही झलक दिखला जा या रिॲलिटी शोमध्ये काम करत आहे. या रिॲलिटी शोमध्ये ती स्पर्धक म्हणून सहभागी झाली आहे. नुकतंच तिला एका मुलाखतीत तिचा प्रवास आणि माधुरी दीक्षितबद्दल विचारणा करण्यात आली. त्याबद्दल ती म्हणाली, "आयुष्याने माझ्या पदरात जे काही टाकले आहे त्यावरुन मी बऱ्याच गोष्टी शिकले आहे. मी कधीही कोणत्याही नृत्य प्रकाराचे शिक्षण घेतलेले नाही. पण मी जेव्हा सिनेसृष्टीत प्रवेश केला त्यावेळी गणेश आचार्य, अहमद खान आणि आशिष पाटील यासारख्या गुरुंकडून मला खूप काही शिकायला मिळाले. पण यासाठी लागणारे औपचारिक प्रशिक्षण मी घेतलेले नाही.""मला आजही माझा पहिला परफॉर्मन्स फार चांगला आठवतोय.

# "... अन् आजही मी त्यावर ठाम "

मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि अभिनेत्री अमृता खानविलकर या दोघीही गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने झी मराठीवरील बस बाई बस या कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी तिला सहप्रवाशी म्हणून अमृता खानविलकरचा फोटो दाखवण्यात आला होता. हा फोटो पाहिल्यानंतर तिने अनेक गोष्टींवर भाष्य केले होते. आम्ही एकत्र काम केलं असतं तर नक्कीच मैत्री झाली असती. आमच्यात वैरही नाही, असे सोनालीने स्पष्टपणे सांगितले होते.

सोनाली कुलकर्णीच्या या वक्तव्यानंतर आता सोशल मीडियावर अमृता खानविलकरचा या कार्यक्रमातील व्हिडीओ व्हायरल होत आहे. अमृता खानविलकरने 'बस बाई बस' या कार्यक्रमात सहप्रवाशी म्हणून सोनाली कुलकर्णीशी संवाद साधला होता. त्यावेळी सोनाली कुलकर्णीचा फोटो पाहताच अमृता खळखळून हसली होती. त्यानंतर अमृता म्हणाली होती की, 'जेव्हा ती येईल तेव्हा तुम्ही माझा फोटो द्याल, असं वचन द्यायला हवं.' त्यावर सुबोध भावे 'देऊ, आम्हाला काहीही अडचण नाही' असं म्हणाला. त्यापुढे ती म्हणाली, 'अनेकांना हे माहिती नाही पण मी तिला सोना असंच म्हणते. तुम्ही नि:शब्द करुन टाकलंय मला हा फोटो दाखवून.' त्यावर सुबोधने "तिला दोन प्रवासी



काहीही न बोलता झोपूनही जाऊ शकतात. बोललंच पाहिजे असं काहीही नाही", असे सांगितले. पण तिने सोनालीशी फार छान संवाद साधला.

सोना... कुठून सुरुवात करायची गं? हे फार विनोदी आहे ना की तुझा आणि माझा प्रवास खूप एकत्रच सुरु झाला. तू देखील तितकेच उतार चढाव पाहिलेत जितके मी पाहिलेत. सर्वात आधी तुझे अभिनंदन मी तुझ्या लग्नाचे, हनिमूनचे फोटो मी बघितले आणि फार कडक दिसत होतीस तू... आणि काय सांगू तुला?? एकदा बॅकस्टेज तू आणि मी आपण भेटलो होतो तेव्हा तू मला सांगितलं होतंस की आजही लोकांना तुला आणि मलाच एकत्र बघायचं अमृता....आणि त्या गोष्टीवर मी आजही ठाम आहे. मला या गोष्टीचा फार आनंद आहे की तिही माझ्यासारखी जिद्दी आहे, मेहनती आहे. कधीतरी ती पुढे, मी मागे, तर कधी मी पुढे, ती मागे...असं आमचं सतत सुरु असतं. पण मला फार आनंद आहे की मी तिच्यासारख्या अतिशय सक्षम अभिनेत्रीबरोबर माझं वन ऑन वन सुरु असतं. आता जर ती इथे असती तर तिचं यावर फार वेगळं म्हणणं असतं. एक गंमतीशीर गोष्ट आहे की सोनाला माहिती असतं की मी काय बोलणार आहे आणि मला माहिती असते की ती काय बोलणार आहे. तुम्ही पाहाल तर आम्ही मैत्रीणीही आहोत आणि नाही देखील, असे अमृता खानविलकरने म्हटले होते.

# शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण पुन्हा झळकणार



'ओम शांती ओम' चित्रपटातून बॉलिवूडला नवी 'शांती' मिळाली. या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे कौतुक झाले होते. मॉडेल अभिनेत्री दीपिका पदुकोणने आपल्या अभिनयाच्या जोरावर बॉलिवूडमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. 'गेहराइया' चित्रपटात ती दिसली होती. नुकताच प्रदर्शित झालेल्या ब्रह्मास्त्रच्या पुढील भागात ती दिसणार अशी चर्चा आहे. नुकतेच तिने आपल्या आगामी चित्रपटाच्या डबिंगला सुरवात केली आहे. शाहरुख खानच्या 'पठाण' या चित्रपटात ती आपल्याला दिसणार आहे.दीपिका या चित्रपटात शाहरुख खान, जॉन अब्राहाम यांचबरोबर झळकणार आहे. याबाबतची पोस्ट तिने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केली आहे. तिने स्टुडिओमधला फोटो शेअर करत त्यावर कॅप्शन दिला आहे की #WIP #PATHAN म्हणजेच पठाण चित्रपटाचे काम सुरु आहे. २५ जुलै रोजी या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित झाले होते.

## शॉर्ट न्यूज »

### महिला आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर



**सूरत । महाईन्यूज**

अखिल भारतीय महिला निवड समितीने (ACC) महिला टी२० आशिया चषक २०२२ साठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान बांगलादेशातील सिल्हेट येथे होणाऱ्या या स्पर्धेत हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करणार आहे. शेफाली वर्मा, रिचा घोष, स्नेह राणा, डी हेमलता, मेघना सिंग, रेणुका ठाकूर, राधा यादव आणि केपी नवगैरे या खेळाडू पहिल्यांदाच महिला आशिया चषक खेळणार आहेत. तान्या भाटिया, सिमरन दिल बहादूर यांना राखीव खेळाडू म्हणून ठेवण्यात आले आहे.

आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह यांनी महिला आशिया चषक २०२२ च्या आठव्या आवृत्तीचे वेळापत्रक जाहीर केले. १ ऑक्टोबरपासून या स्पर्धेला सुरुवात होणार असून अंतिम सामना १५ ऑक्टोबरला होणार हे. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, थायलंड, मलेशिया, यूएई आणि बांगलादेशचे संघ सहभागी होणार आहेत.

# भारत पहिल्यांदाच नागपुरात ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-20 खेळणार!

## टीम इंडिया या मैदानावर सहा वर्षांपासून हरलेली नाही

**।होव्ह । महाईन्यूज ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन टी२० सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. शुक्रवारी (२३ सप्टेंबर) टीम इंडिया मालिकेत बरोबरी साधण्यासाठी या मैदानावर उतरणार आहे. पहिल्या सामन्यात त्यांना चार गडी राखून पराभव स्वीकारावा लागला होता. भारतीय संघाने हा सामना जिंकला नाही तर मालिका गमवावी लागेल. या मैदानावरील भारताचा विक्रम पाहता, गेल्या सहा वर्षांपासून तो येथे हरलेला नाही.

भारतीय संघ पाचव्यांदा टी२० सामना खेळण्यासाठी नागपुरात उतरणार आहे. १० नोव्हेंबर २०१९ रोजी ते बांगलादेशविरुद्ध येथे शेवटचा सामना खेळले होते. त्यानंतर तो सामना ३० धावांनी जिंकला. नागपुरात आतापर्यंत झालेल्या चार सामन्यांमध्ये भारतीय संघाने दोन जिंकले आहेत. त्याचवेळी त्यांना दोन सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागले. ते येथे प्रथमच ऑस्ट्रेलियाविरुद्ध



### शेवटचा पराभव 2016 मध्ये नागपुरात झाला होता

१५ मार्च २०१६ रोजी नागपुरात भारताचा शेवटचा पराभव झाला होता. त्यावेळेस टी२० विश्वचषकातील सुपर-१० सामन्यात न्यूझीलंडने भारताचा ४७ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना किवी संघाने सात गड्यांच्या मोबदल्यात १२६ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ १८.१ षटकांत ७९ धावांत गारद झाला. महेंद्रसिंग धोनी संघाचा कर्णधार होता. त्या पराभवानंतर भारताने येथे एकही सामना गमावलेला नाही.

### भारतीय संघाची नागपुरातील कामगिरी

- ९ डिसेंबर २००९ श्रीलंकेकडून भारताचा २९ धावांनी पराभव झाला
- १५ मार्च २०१६ न्यूझीलंडकडून भारताचा ४७ धावांनी पराभव झाला
- २९ जानेवारी २०१७ इंग्लंडवर भारताचा ५ धावांनी विजय
- १० नोव्हेंबर २०१९ बांगलादेशवर भारताचा ३० धावांनी विजय

# "निवृत्तीची योजना बाहेर फुटणारच होती म्हणून घाईघाईने मी निवृत्ती जाहीर केली"

**।नवी दिल्ली । महाईन्यूज ।**



दिग्गज टेनिसपटू रॉजर फेडरर शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या लेव्हर चषक स्पर्धेनंतर टेनिसला अलविदा करणार आहे. मात्र, आपण टेनिसचे इतिहास बनणार नाही, अशी ग्वाही या खेळाडूने चाहत्यांना दिली आहे. तो खेळाशी जोडला जाईल. फेडररने बुधवारी निवृत्तीच्या संदर्भात सांगितले की, त्याला त्याची औपचारिक घोषणा करायची होती. मला कळले की माझी निवृत्तीची योजना बाहेर फुटणार आहे. त्यामुळे मला तडकाफडकी निवृत्तीची घोषणा आधीच जाहीर करावी लागली.

फेडररने १५ सप्टेंबर रोजी लंडनमधील लेव्हर चषकनंतर त्याचे टेनिस रॅकेट घरातील भिंतीला लटकवणार असल्याचे उघड केले. विक्रमी आठ विम्बल्डनसह २० ग्रँडस्लॅम जिंकणाऱ्या फेडररने सांगितले की, मी या टेनिसमधून निवृत्ती जरी घेत असलो तरी आयुष्यभर याचं खेळासाठी कुठल्या ना कुठल्या स्वरुपात मार्गदर्शन करत राहील. लंडनच्या ओ2 एरिना येथे पत्रकारांशी बोलताना स्विस खेळाडू काही वेळासाठी भावूक झाला. त्याने येथे दोनदा एटीपी स्पर्धेच्या अंतिम फेरीचे विजेतेपद पटकावले आहे.

भविष्यातील त्याच्या योजनांबद्दल विचारले असता, फेडरर म्हणाला, तो स्वीडिश महान ब्योर्न बोर्गसारखा खेळातून पूर्णपणे अंग काढून घेणार नाही. लेव्हर चषकमध्ये फेडरर उर्वरित जगाविरुद्ध युरोपचे नेतृत्व करत आहे. "मी चाहत्यांना सांगू इच्छितो की मी खेळ सोडणार नाही. फेडररने ११ वेळा ग्रँड स्लॅम विजेते के ब्योर्न बोर्गबद्दल सांगितले, ज्याने वयाच्या २६ व्या वर्षी टेनिसमधून निवृत्ती घेतली, कारण निवृत्तीनंतर २५ वर्षे तो विम्बल्डनमध्ये परतला नाही. यामुळे चाहत्यांना खूप दुःख झाले." "टेनिसने मला खूप काही दिले आहे. त्यामुळे तुम्हाला कुठल्या ना कुठल्या स्वरुपात मी पुन्हा भेटत राहीन.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही